जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2025
पुढारी

# ग्रामीण भागातून आलेल्या क्रीडापटूंमुळे विद्यापीठाचा नावलौकिक : कुलगुरू

## क्रीडामहर्षी नागेशकर चषकाचे न्यू कॉलेज सातव्यांदा मानकरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ग्रामीण भागातून आलेले क्रीडापटू अतिशय कष्ट व संघर्षातून कारकीर्द घडवित आहेत. त्यांच्यामुळेच विद्यापीठाचा लौकिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये वाढत आहे, असे कौतुकोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणाऱ्या २०२३-२४ साठीच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कारांचे वितरण कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले, यावेळी ते बोलत होते. कोल्हापूर येथील न्यू कॉलेजने सर्वाधिक १०५२ गुण प्राप्त करीत सलग सातव्या वर्षी प्रथम क्रमांकाचा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर फिरता चषक, कायमस्वरुपी चषक, प्रमाणपत्र आणि रोख ५० हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले.

शहाजी महाविद्यालयाने ६३४ गुण प्राप्त करीत द्वितीय क्रमांकाचा चषक, प्रमाणपत्र आणि रोख २५ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले.

गडहिंग्लज येथील शिवराज महाविद्यालय साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालयाने ५२४ गुणांसह तृतीय क्रमांकाचा चषक, प्रमाणपत्र आणि रोख १५ हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. आर. के. शानेदिवाण आणि डॉ. अनिल कुराडे यांनी अनुक्रमे तिन्ही क्रमांकाच्या पारितोषिकांचा स्वीकार केला. क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले, किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. ज्योती जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. राहुल मगदूम, अमर सासणे उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील व त्यांचे क्रीडापटू व सहकारी. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)**

### यंदापासून पारितोषिकाच्या व्याप्तीत वाढ

गतवर्षीपर्यंत क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पारितोषिक हे केवळ एकाच महाविद्यालयाला देण्यात येत असे. या संदर्भात अनेक महाविद्यालयांकडून विचारणा होत असे, ही बाब विद्यापीठाच्या अधिकार मंडळांसमोर मांडण्यात आली. त्यानुसार व्यवस्थापन परिषदेने पारितोषिकाची व्याप्ती या वर्षापासून वाढविण्याचा निर्णय घेतला असून, प्रथम तीन महाविद्यालयांना पारितोषिके देण्याचे ठरले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2025

सकाळ

# नागेशकर चषकाचा न्यू कॉलेज सातव्यांदा मानकरी

## यंदापासून पारितोषिकाच्या व्याप्तीत वाढ; विद्यापीठात पुरस्कारांचे वितरण

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या सन २०२३-२४ सांठीच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कारांचे वितरण आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. न्यू कॉलेजने सर्वाधिक १०५२ गुण प्राप्त करीत सलग सातव्या वर्षी प्रथम क्रमांकाचा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर फिरता चषक, कायमस्वरूपी चषक, प्रमाणपत्र आणि रोख ५० हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाने ६३४ गुण प्राप्त करीत द्वितीय क्रमांकाचा चषक, प्रमाणपत्र आणि रोख २५ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. गडहिंग्लज येथील शिवराज महाविद्यालय साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालयाने ५२४ गुणांसह तृतीय क्रमांकाचा चषक, प्रमाणपत्र आणि रोख १५ हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. आर. के. शानेदिवाण आणि डॉ. अनिल कुराडे यांनी अनुक्रमे तिन्ही क्रमांकांच्या पारितोषिकांचा स्वीकार केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही.एम. पाटील आणि त्यांचे क्रीडापटू व सहकारी. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवर.

> ‘विद्यापीठाच्या ग्रामीण भागातून आलेले क्रीडापटू अतिशय कष्ट आणि संघर्षातून आपली कारकीर्द घडवित आहेत. त्यांच्यामुळेच विद्यापीठाचा लौकिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये वाढत आहे. त्यांना विविध स्पर्धांमध्ये मिळणारे यश हे त्यांच्या कष्ट, संघर्षाचे फलित आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या पालकांच्या पाठिंब्याचा गौरवसुद्धा आहे. या विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा प्रदान करण्यासाठी विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशील आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**

गतवर्षीपर्यंत क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पारितोषिक हे केवळ एकाच महाविद्यालयाला देण्यात येत असे. त्यामध्ये फिरता चषक आणि प्रमाणपत्र यांचा समावेश असे. त्यामुळे अन्य महाविद्यालयांना त्यांच्या प्रगतीविषयी काहीही कल्पना येत नसे. या संदर्भात अनेक महाविद्यालयांकडून विचारणा होत असे. त्यानुसार व्यवस्थापन परिषदेने या विषयाचा आढावा घेऊन पारितोषिकाची व्याप्ती या वर्षापासून वाढविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्रथम तीन महाविद्यालयांना गुणांकनानुसार पारितोषिके देण्याचे ठरले. फिरत्या चषकासोबतच कायमस्वरूपी चषक, प्रमाणपत्र आणि अनुक्रमे ५० हजार, २५ हजार आणि १५ हजार रुपये रोख पारितोषिके देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिली.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. ज्योती जाधव, महादेव देशमुख, रघुनाथ ढमकले, प्रशांत पाटील, राहुल मगदूम, अमर सासने, सुजय खोपडे, धनंजय पाटील उपस्थित होते. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. किरण पाटील यांनी आभार मानले.

2 3 AUG 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रामीणचे क्रीडापटू कारकीर्द घडवत आहेत

## कुलगुरू डॉ. शिर्के ; विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी नागेशकर चषकाचा न्यू कॉलेज सातव्यांदा मानकरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ग्रामीण भागातून आलेले क्रीडापटू अतिशय कष्ट आणि संघर्षातून आपली कारकीर्द घडवत आहेत. त्यांच्यामुळेच विद्यापीठाचा लौकिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये वाढत आहे, असे उद्‌गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२३-२४ साठीच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पुरस्कारांचे वितरण कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. दि न्यू कॉलेजने सर्वाधिक १०५२ गुण प्राप्त करत सलग सातव्या वर्षी प्रथम क्रमांकाचा क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर फिरता चषक, कायमस्वरूपी चषक, प्रमाणपत्र आणि रोख ५० हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील आणि त्यांचे क्रीडापटू व मान्यवर.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठात आणि संलग्नित महाविद्यालयांत प्रवेशित होणारे बहुतांश विद्यार्थी-विद्यार्थिनी खेड्यापाड्यांतून येतात. क्रीडा क्षेत्रात कारकीर्द घडविण्यासाठी अव्याहत कष्ट करतात. त्यांना विविध स्पर्धांमध्ये मिळणारे यश हे त्यांच्या कष्ट, संघर्षाचे फलित आहे.

यावेळी कोल्हापूर येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाने ६३४ गुण प्राप्त करीत द्वितीय क्रमांकाचा चषक, प्रमाणपत्र आणि रोख २५ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. तर गडहिंग्लज येथील शिवराज महाविद्यालय साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्योलयाने ५२४ गुणांसह तृतीय क्रमांकाचा चषक, प्रमाणपत्र आणि रोख १५ हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त केले. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. आर. के. शानेदिवाण आणि डॉ. अनिल कुराडे यांनी अनुक्रमे तिन्ही क्रमांकांच्या पारितोषिकांचा स्वीकार केला.

विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. ज्योती जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. राहुल मगदूम, अमर सासने, सुचय खोपडे, डॉ. धनंजय पाटील आदी उपस्थित होते.

### यंदापासून पारितोषिकाच्या व्याप्तीत वाढ

गतवर्षीपर्यंत क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर पारितोषिक हे केवळ एकाच महाविद्यालयाला देण्यात येत असे. त्यामध्ये फिरता चषक आणि प्रमाणपत्र यांचा समावेश असे. या वर्षापासून प्रथम तीन महाविद्यालयांना गुणांकनानुसार पारितोषिके देण्याचे ठरले. फिरत्या चषकासोबतच कायमस्वरूपी चषक, प्रमाणपत्र आणि अनुक्रमे ५० हजार, २५ हजार आणि १५ हजार रुपये रोख पारितोषिके देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पारितोषिक वितरण करण्यात येत असल्याची माहितीही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी यावेळी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2025
सकाळ

# नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा

## डॉ. शिर्के : कोरे अभियांत्रिकीमध्ये डिजिटल फाउंड्री कार्यशाळा



वारणानगर : रवी डोल्ली यांचा सत्कार करताना डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. एस. एम. पिसे, डॉ. डी. एन. माने, डॉ. पी. व्ही. मुळीक, डॉ. एम. एस. धुत्तरगाव.

वारणानगर, ता. २२ : "विद्यार्थ्यांनी औद्योगिक वसाहती फिरण्यासाठी वेळ काढून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे," असे आवाहन वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे केले.

तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकीमधील मेकॅनिकल विभाग आणि एआयसीटीइ (वाणी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "डिजिटल फाउंड्री : आयओटी, रोबोटिक्स व ॲटोमेशन यांचे एकत्रीकरण' विषयावर आयोजित तीनदिवसीय कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. मयुरा ग्रुपचे कार्यकारी संचालक रवी डोल्ली यांनी कामगारांना बदलून त्याठिकाणी ॲटोमेशन वापरले जावे, अशा क्रांतीची अजून येथे गरज नाही, तर जेथे मानवी सुरक्षितता गरजेची आहे. तेथे हे तंत्रज्ञान वापरले जावे, असे सांगितले. कार्यशाळेत मौर्या इंडस्ट्रीजचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मंगेश पाटील, घाटगे पाटील इंडस्ट्रीजचे संचालक आदित्य पाटील, इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फाउंड्रीमनचे अध्यक्ष राहुल पाटील, डॉ. एस. एस. मोहिते व डॉ. एस. एस. ओहोळ, मोईन सिद्दीकी (सिमेन्स डिजिटल इंडस्ट्रीज सॉफ्टवेअर, पुणे), प्रा. शैलेश शिरगुप्पीकर (आर. आय.टी., सांगली), सी. पी. महाजन (सीईओ, डॉल्फिन लॅब. पुणे) यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी वारणा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कारजिन्नी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी अधिष्ठाता डॉ. एस. एम. पिसे, प्राचार्य डॉ. डी. एन. माने, विभागप्रमुख डॉ. पी. व्ही. मुळीक, समन्वयक डॉ. एम. एस. धुत्तरगाव, सहसमन्वयक डॉ. एस. व्ही. लिंगराजू आणि महाराष्ट्र, कर्नाटकातून दीडशेहून अधिक विद्यार्थी, उद्योजक आणि प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. कृष्णकुमार जोशी यांनी सूत्रसंचालन, डॉ. मुकुंद धुत्तरगाव यांनी आभार मानले.

2 3 AUG 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# ज्ञानव्यवस्थापनाद्वारे पर्यावरण संरक्षण होणे आवश्यक

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

सहकारी ज्ञान व्यवस्थापनाद्वारे पर्यावरणाचे संरक्षण होणे आवश्यक आहे. त्यासाठी सार्वत्रिक प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जेष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र व निसर्ग व मानवी संरक्षणासाठी मोहीम यांच्या वतीने आयोजित पर्यावरण, जीवनमान आणि वनहक्क कायदे या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते ऑनलाईन पध्दतीने बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

## ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ




**कोल्हापूर : राष्ट्रीय परिसंवादात मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. भारत पाटणकर, डॉ. के. जे. जॉय, अविनाश भाले आदी.**

डॉ. गाडगीळ म्हणाले, जगभरामध्ये हितसंबंधी भांडवलशाहीमुळे बाजारव्यवस्थेत प्रामाणिक स्पर्धकांना संधी मिळत नाही. नैसर्गिक व सार्वजनिक संसाधनांचा अपव्यय होत आहे. परिणामी भ्रष्टाचार आणि आर्थिक विषमता वाढत आहे. मात्र भारतात लोकशाही टिकून असल्यामुळे अनेक लोकाभिमुख कायदे मंजूर केले जात आहेत. वनाधिकार कायद्याद्वारे जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न होत आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, हवामानामुळे होणारे बदल समजून घेणे आवश्यक बनले आहे. वातावरणात कार्बन व मिथेनचे प्रमाण वाढत असून याचा जंगल, समुद्र, पृथ्वी या घटकांवर विपरीत परिणांम होतो आहे. हे आपण वेळीच ओळखून सावध पाऊले उचलली नाहीत तर भविष्यात विपरीत परिणाम होणार आहेत.

विविध सत्रांमध्ये डॉ. भारत पाटणकर, एस. आर. हिरेमठ, प्रदीप चव्हाण, विजय एदलाबादकर, सचिंद्र लेले, संपत देसाई, अविनाश भाले, अमोल वाघमारे, किरण लोहकरे, शैलश सावंत, नूतन माळवी आणि सुभाष डोळस यांनी विविध विषयांवर मांडणी केली. सुपेकॉमचे के. जे. जॉय यांनी या राष्ट्रीय परिसंवादाची भूमिका विषद केली. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. तर डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.

2 3 AUG 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकारी ज्ञानव्यवस्थापनाद्वारे पर्यावरण संरक्षण होणे आवश्यक

## माधव गाडगीळ : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय परिसंवाद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २२ : 'सहकारी ज्ञान व्यवस्थापनाद्वारे पर्यावरणाचे संरक्षण होणे आवश्यक आहे. त्यासाठी सार्वत्रिक प्रयत्न करण्याची गरज आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी गुरुवारी (ता.२१) केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र व निसर्ग व मानवी 'संरक्षणासाठी मोहीमतर्फे आयोजित 'पर्यावरण, जीवनमान आणि वनहक्क कायदे' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते ऑनलाईन बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.



माधव गाडगीळ

डॉ. गाडगीळ म्हणाले, 'जगभरामध्ये हितसंबंधी भांडवलशाहीमुळे बाजारव्यवस्थेत प्रामाणिक स्पर्धकांना संधी न मिळाल्याने नैसर्गिक व सार्वजनिक संसाधनांचा अपव्यय होत आहे. परिणामी भ्रष्टाचार आणि आर्थिक विषमता वाढत आहे. मात्र, भारतात लोकशाही टिकून असल्यामुळे अनेक लोकाभिमुख कायदे मंजूर केले जात आहेत. वनाधिकार कायद्याद्वारे जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न होत आहे. नैसर्गिक संपत्तीचा टिकाऊ पद्धतीने वापर व त्याचा न्याय्य लाभ सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी वनाधिकार कायदा हे एक मोठे आव्हान आहे आणि त्याचबरोबर ती एक सुवर्णसंधी सुद्धा आहे.' 'वातावरणात कार्बन व मिथेनचे प्रमाण वाढत असून, याचा जंगल, समुद्र, पृथ्वी या घटकांवर विपरीत परिणाम होतो आहे. हे आपण वेळीच ओळखून सावध पावले उचलली नाहीत, तर येणाऱ्या पिढ्यांच्या जीवनात त्याचे विपरीत परिणाम होणार असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले. यावेळी के. जे. जॉय यांनी या राष्ट्रीय परिसंवादाच्या आयोजनामागील भूमिका विषद केली. सहायक संचालक अविनाश भाले यांनी स्वागत केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले.

### अभ्यासकांची विविध विषयांवर मांडणी

दोनदिवसीय परिसंवादामधील विविध सत्रांमध्ये डॉ. भारत पाटणकर, एस. आर हिरेमठ, प्रदीप चव्हाण, धैर्यशील पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विजय एदलाबादकर, सचिंद्र लेले, संपत देसाई, अविनाश भाले, अमोल वाघमारे, किरण लोहकरे, शैलश सावंत, नूतन माळवी, सुभाष डोळस यांनी विविध विषयांवर मांडणी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2025
पुढारी

# विद्यापीठात सोमवारी क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी. लाड अध्यासनाचा प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड अध्यासन स्थापित आहे. त्यानिमित्त सोमवारी (दि. २५) सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात विशेष व्याख्यान व शाहिरी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

ज्येष्ठविचारवंत, साहित्यिक उत्तम कांबळे यांचे 'भारतीय स्वातंत्र्यलढा आणि जी. डी. (बापू) लाड' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. कोल्हापूरचे शाहीर सदाशिव निकम यांचा शाहिरी कार्यक्रम होणार आहे. विधान परिषदेचे सदस्य अरुण लाड व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2025

सकाळ

# 'तंत्रज्ञान'च्या ६० विद्यार्थ्यांची स्कॉलरशिपसाठी निवड

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये आयोजित कॅम्पस ड्राईव्हमधून ६० विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप आणि इंटर्नशिपसाठी विविध कंपन्यांमध्ये निवड झाली. त्यात किरण अॅकॅडमी पुणे, क्यू-स्पायडर (टेस्ट यंत्रा सॉफ्टवेअर सोल्युशन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) आणि जीआरडी टेक सोल्युशन एलएलपी या कंपन्यांचा समावेश आहे.

या ड्राईव्हमध्ये किरण अॅकॅडमी, पुणेने एकूण १० विद्यार्थ्यांची निवड केली. क्यू-स्पायडरने एकूण ३० विद्यार्थ्यांची निवड केली असून, त्यांना स्कॉलरशिप व इंटर्नशिपसह प्रशिक्षणाची संधी दिली आहे. या प्रशिक्षण संस्थांकडून विद्यार्थ्यांना नवीनतम तंत्रज्ञानांवर प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यामध्ये जेनेरेटिव्ह एआय, प्रॉम्पट इंजिनिअरिंग, अॅडव्हान्स जावा, फायटॉनचा समावेश आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्लेसमेंटसाठी मार्गदर्शन आणि मदतही केली जाणार आहे. जीआरडी टेक एलएलपी या उद्योग संस्थेने एकूण २० विद्यार्थ्यांची निवड केली असून, या विद्यार्थ्यांना इंडस्ट्रीमध्ये अंतिम वर्षाचे प्रोजेक्ट पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे. या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान विभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर, डॉ. गणेश पाटील, अमर डूम, डॉ. चेतन आवटी आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 AUG 2025
पुढारी

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये आयोजित कॅम्पस ड्राईव्हला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यामध्ये स्कॉलरशिप व नामांकित कंपन्यांमध्ये ६० विद्यार्थांची निवड झाली.

प्रशिक्षण संस्थांकडून विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्लेसमेंटसाठी मार्गदर्शन व मदत केली जाणार आहे. या संस्थांनी विद्यार्थ्यांना पेड इंटर्नशिपची संधीही मिळणार आहे. कॅम्पस ड्राईव्हमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप, इंटर्नशिप व उद्योग क्षेत्राचा थेट अनुभव घेण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. विभागाचे प्र. संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. प्लेसमेंट सेल अधिकारी डॉ. गणेश पाटील व प्लेसमेंट शाखा समन्वयक अमर डूम व डॉ. चेतन आवटी यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2025

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील ६० विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस ड्राईव्हला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. त्यांनी एकूण ६० विद्यार्थ्यांची निवड केली. विद्यार्थ्यांनी लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत व व्यक्तिमत्त्व चाचणी अशा टप्प्यांमधून हे यश संपादन केले. विभागाचे प्र. संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. निवडीसाठी विभागाचे प्लेसमेंट सेल अधिकारी डॉ. गणेश पाटील, अमर डूम, डॉ. चेतन आवटी आदी परिश्रम घेत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2025
पुढारी

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव जनजागृती कार्यशाळेस प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव काळातील ध्वनिप्रदूषण, प्लास्टिक व थर्माकोलचा वापर याबाबत जागृतीसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाच्या विभाग प्रमुख डॉ.आसावरी जाधव यांनी गणेशोत्सव काळात विविध प्रकारे होणाऱ्या प्रदूषणाबाबत माहिती दिली. हे प्रदूषण कसे टाळता येईल याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे जनजागृती केली. उपक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील, प्रा. पी. आर.बागडे, प्रा. हेमंत पाटील, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. राजश्री पाटील, एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 AUG 2025
सकाळ

# चेतन भोसले यांना पीएच.डी.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या



चेतन भोसले

पर्यावरणशास्त्र विभागातील विद्यार्थी चेतन श्रीकांत भोसले यांना पीएच.डी. पदवी मिळाली आहे. त्यांनी 'एअर क्वॉलिटी मॉनिटरिंग, इमिशन इन्व्हेंटरी अँड सोर्स अप्पोरनमेंट स्टडी ऑफ कोल्हापूर सिटी महाराष्ट्र' या विषयावरील संशोधन प्रबंध विद्यापीठाला सादर केला. त्यांना प्रा. डॉ. पी. डी. राऊत, विभागप्रमुख प्रा. डॉ. आसावरी जाधव मार्गदर्शन लाभले.